# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक:संकिर्ण १६-१७/प्र.क्र.२२९/प्रनिप्रा

दिनांक : २४ ऑगस्ट, २०१८

प्रति,
प्राचार्य/अधिष्ठाता,
विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती विहीत वेळेत सादर न केलेल्या महाविद्यालयांनी सदर माहिती ऑनलाईन सादर करणेबाबत...

संदर्भ:
१. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. ३/११/२०१७ चे पत्र
२. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. २८/११/२०१७ चे पत्र
३. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. ६/१२/२०१७ चे पत्र
४. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. १२/१२/२०१७ चे पत्र
५. प्रवेश नियामक प्राधिकरणाचा दि. २४/०१/२०१८ रोजीच्या बैठकितील निर्णय.
६. प्रवेश नियामक प्राधिकरणाचा दि.२२/०२/२०१८ रोजीच्या बैठकितील निर्णय.
७. या कार्यालयाचे शासनास लिहीलेले क्र. प्रनिप्रा/प्रवेश मान्यता/२०१८/७७, दि.०५/०३/२०१८ चे पत्र.
८. प्रवेश नियामक प्राधिकरणाचा दि.१५/०६/२०१८ रोजीच्या बैठकितील निर्णय.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव, संबंधित संचालकांकडून प्रमाणित करुन विहित कालावधीत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

२. संदर्भ क्र. १ ते ४ च्या पत्रांन्वये प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर सादर करण्याबाबतचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले होते. तथापि काही महाविद्यालयांनी अद्याप प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती, संकेतस्थळावर प्रक्रिया शुल्कासहित, सादर केलेली नाही. अशा महाविद्यालयांनी **दि.०१/०९/२०१८ ते दि.१५/०९/२०१८** पर्यंत प्रवेश प्रक्रिया शुल्क + विहीत केल्यानुसार विलंब शुल्कासहित त्यांच्या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मधिल पदव्युत्तर/पदवी/पदविका अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.maha-ara.org किंवा www.pnsamiti.com या संकेतस्थळावर सादर करावयाची आहे.

३. ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधीत संचालकांकडून प्रमाणित करुन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी विहीत केलेल्या प्रपत्रात सादर केलेली नाहीत, अशा महाविद्यालयांनी त्वरीत प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयात निश्चितपणे सादर करावेत.

४. वरील वेळापत्रकानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन तसेच, प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव सादर न केल्यामुळे संबंधीत प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित न झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, तसेच शै. वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेस प्रवेश नियामक प्राधिकरणांकडून मान्यता देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उशिराने प्राप्त होणाऱ्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांबाबत पुढील कार्यवाही उक्त अधिनियमातील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार विहीत करण्यात आलेल्या कालावधीसंदर्भात शासनाच्या पुढील निर्णयास अनुसरुन राहिल, याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्रे :- वरिलप्रमाणे

**(राजेंद्र बोरकर)**
**विशेष कार्य अधिकारी,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई**

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित, -

१. सर्व संचालक, वैद्यकिय शिक्षण/उच्चशिक्षण/तंत्रशिक्षण/कलाशिक्षण/आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्याशी निगडीत महाविद्यालयांचे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव विहीत केलेल्या प्रपत्रात प्रमाणित करुन प्राधिकरणाकडे विहीत वेळेत संबंधीत महाविद्यालयांकडून सादर करण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

२. मे.विशुमंगल टेक्नोलॉजी प्रा.लि. पुणे यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मधिल वरील कालावधीसाठी प्रक्रिया शुल्क + विहीत केल्यानुसार विलंब शुल्क आकारण्याबाबत ऑनलाईन सिस्टिममध्ये योग्य ते बदल करुन उचित कार्यवाही करावी.

३. निवड नस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.